# <u>दिनांक १८/१२/२०२० रोजी झालल्या निर्यात विषयक जिल्हा कार्यबल किती सभेचे कार्यवृत्त</u>

दिनांक १८/१२/२०२० रोजी महाव्यवस्थापकजिल्हा उद्योग केंद्र भंडारा यांचे अध्श्क्षतेखली दुपारी २.०० वा.निर्यात विषयक जिल्हा कार्यबल समितीची सभा <u>जिल्हा</u> उद्योग केंद्र भंडारा येथे संपन्न झली .सभेत खालीलप्रमाणे अधिकारी व निर्यातदार हजर होते.

१) श्री संभाजी चव्हाण ,जॉईंट डायरेक्टर ,फॉरेन ट्रेड ,नागपूर (ऑनलाईन पध्दतीने),

२) श्री कुंभलवार,व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक ,भंडारा.

३) श्री. संदीप देवगीरकर,डीडीएम,नाबार्ड,भंडारा.

४) श्री. शिरिष निर्वाण निर्यातदार अगरबत्ती क्लस्टर,लाखनी.

सभेमध्ये सर्वप्रथम जिल्हयाचा कृती आराखडा तयार करण्याचे दृष्टीने निर्यातदार व शासकिय विभागाकडून निर्यात संबंधी महिती गोळा करण्याविषयी चर्चा करण्यात आली. जिल्हयातील अगरबत्ती व तांदूळ निर्यातदार यांनी निर्यातविषयी माहिती त्वरित सादर करण्याची सुचना करण्यात आली.तसेच समिती सदस्यांनी त्यांचे विभागाकडे निर्यात विषयी आलेल्या योजनांची माहिती सादर करण्याची सुचना करण्यात आली.

जिल्हयात तांदळादिवाय इतर शेती उत्पादने/फळे ,भाजीपाली यांची निर्यात करण्याच्या दृष्टीने अपेडा समवेत OutReach कार्यक्रम घेण्याची सुचना श्री. संभाजी चव्हाण यांनी केली.याशिवाय अगरबत्ती निर्यात वाढीसाठी अगरबत्ती क्लस्टर सदस्यांकरिता OutReach कार्यक्रम आजित करण्यास समितीने मान्यता दिली.

---